अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# मैत्रीचा हात आणि पाककडून पुन्हा विश्वासघात

परराष्ट्रीय पातळीवर मैत्री हे भारताचे प्रमुख सूत्र आहे. आतापर्यंत यापूर्वीच्या अनेक सरकारांनी तेच प्रयत्न केले. परंतु आपल्या शेजारी असलेल्या पाकिस्तानला मैत्रीची व्याख्याच मान्य झालेली दिसत नाही. प्रामुख्याने पाकिस्तानमधल्या सरकारपेक्षाही तिथे असलेल्या काही भारतविरोधी गटांना ही मैत्री मान्य नाही असेच म्हणावे लागेल. कारण २५ ऑगस्टला भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये सचिव पातळीवर बैठक आयोजित करण्यात आली होती. यापूर्वी काश्मिरमधल्या विघटनवादी गटांना पाकिस्तानने चर्चेचे आमंत्रण दिले.सचिव पातळीवर बैठक होण्यापूर्वी आम्ही काश्मिरमधल्या या विघटनवादी मंडळींचे काय म्हणणे आहे, हे एकूण घेणार आहोत. अशी तद्दन बुरसटलेली आणि मागासलेली भूमिका तिथल्या सरकारमध्ये बसलेल्या काही गटांनी घेतली. हे समजल्याबरोबर नव्याने आरूढ झालेल्या भाजपा सरकारने पाकिस्तानला पहिला फटका लगावला आणि १५ ऑगस्ट रोजी होणारी सचिव पातळीवरची बैठकच रद्द करून टाकली. खरे तर नरेंद्र मोदींच्या शपथविधीच्यावेळी शेजारच्या राष्ट्रांना आमंत्रित करून एक चांगली सुरुवात झाली होती. लांबच्या देशांबरोबर किंवा आपल्यापेक्षा विकसित राष्ट्रांबरोबर संबंध सुधारणे ही गोष्ट जितकी आवश्यक ठरते, त्यापेक्षाही आपल्या शेजारी असलेल्या सगळ्या देशांशी सलोख्याचे आणि मैत्रीपूर्ण संबंध राहिले पाहिजेत. त्याला प्राधान्य देण्याचे काम नव्या सरकारने केले. परंतु यापूर्वीच्या अनुभवाप्रमाणेच पाकिस्तानने पुन्हा एकदा विशेषतः तिथल्या काही गटांनी आपले नापाक इरादे जाहीर केले. काश्मिरमध्ये फुटीरतावाद्यांशी चर्चा करण्याची खेळी करून भारत पाकिस्तान संबंधाचा पुन्हा एकदा त्यांनी खेळखंडोबा मांडला. ज्या ज्या वेळी भारताने मैत्रीचा हात पूर्ण केला त्या त्या वेळी पाकिस्तानकडून भारताचा विश्वासघात होत राहिला. अगदी पंडित नेहरूंपासूनची ही परंपरा पाहायला मिळते. इंदिरा गांधींच्या काळात भारताने सौजन्यपूर्ण वागणूक दाखवल्याचा गैरफायदा घेतला गेला आणि हजारो किलोमीटरच्या भारताच्या भूभागावर पाकिस्तानने कायमचा कब्जा केला. हा प्रदेश आज पाकव्याप्त काश्मिर म्हणून ओळखला जातो. आता पुन्हा उरलेल्या काश्मिरविषयी सतत कुरापती काढण्याचा उद्योग तसाच पुढे चालू आहे.अटल बिहारी वाजपेयी यांनी मोठ्या उत्साहाने त्यावेळचे पाकिस्तानचे पंतप्रधान परवेझ मुशर्रफ यांच्याशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले.भारतातून खास लाहोर बस पाकिस्तानात नेण्याचा आगळावेगळा उपक्रम करून बघितला. परंतु पुढच्याच सहा सात महिन्यामध्ये या कुरापतखोर पाकिस्तानने कारगिलमध्ये घुसखोरी केली आणि भारताला एका युध्दाला सामोरे जावे लागले.आतादेखील नव्याने आलेल्या मोदी सरकारने मैत्रीसाठी पुढाकार घेतला असताना पाकिस्तानातल्या याच भेकडांनी त्याला नकाराचा सूर लावला आहे. सुदैवाने नव्या सरकारने त्यांच्या या कुरापतीला जशास तसे उत्तर देण्याची सुरुवात केली.ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ठरते.

## फुटीरतावाद्यांचे खुशामतखोर

आतापर्यंत भारताने सातत्याने मवाळ भूमिका घेतली. ज्या ज्या वेळी दोन्ही देशांमधील अधिकाऱ्यांची किंवा मंत्रीगटाची चर्चा आयोजित करण्याची वेळ येते त्या त्या वेळी या ना त्या कारणाने त्या प्रयत्नाला सुरुंग लावण्याचा उद्योग पाकिस्तानकडून होत आलेला आहे. तरीदेखील गेल्या दहा वर्षांत भारताने याकडे कानाडोळा केला. अगदी वाजपेयींच्या कारकिर्दीतसुध्दा मुशर्रफ भारतात आले आणि त्यांनी काश्मिरमधले फुटीरतावादी हे स्वातंत्र्यसैनिक असल्याची मुक्ताफळे उधळली होती. त्या वेळीसुध्दा मुशर्रफ आणि वाजपेयी भेटीमध्ये प्रचंड तणाव निर्माण झाला आणि शेवटी मुशर्रफ यांना आपली ही भारतभेट गुंडाळावी लागली होती. पाकिस्तानचे प्रयत्न हे प्रामुख्याने स्वतःचे महत्त्व वाढवण्यासाठी असतात.तसे पाहिले तर अन्य पंतप्रधानांपेक्षा नवाझ शरीफ हे त्यातल्या त्यात सकारात्मक भूमिका घेणारे पाकिस्तानी नेते मानले जातात. अगदी मोदींच्या शपथविधीला उपस्थित राहून त्यांनी एक मोठीच राजकीय सभ्यता आणि समजूतदारपणा दाखवला होता. त्याचे पुढचे पाऊल म्हणूनच ही सचिव पातळीवरची भूमिका यशस्वी होऊ शकली असती. परंतु मध्येच पाकिस्तानातल्या काही भारतविरोधी गटांना काश्मिरमधल्या फुटीरतावाद्यांचा कळवळा आला. आणि या चांगल्या प्रयत्नांमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न झाला.नव्या वातावरणात नव्या सरकारने घेतलेली कडक भूमिका पाकिस्तानच्या लक्षात यायला हरकत नाही.आणि एकूणच जगाच्या पातळीवर परराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप बदलले आहे.भूभाग बळकावण्यापासून ते एकमेकांच्या राष्ट्रांमध्ये लुडबूड करण्याचे दिवस आता संपलेले आहेत. ग्लोबल व्हिलेजच्या या युगात विज्ञान तंत्रज्ञान आणि व्यापाराच्या पातळीवर आर्थिक संबंध सुधारण्यासाठीच परराष्ट्र धोरण राबवले जाते. पाकिस्तानसारख्या देशाला तर स्वतःची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी अशा प्रगतशील दृष्टीकोनाची अत्यंत आवश्यकता आहे. भारतासारखा देश त्यासाठी पुढाकार घेत असेल तर पाकिस्ताननेसुद्धा ही संधी साधली पाहिजे आणि तिथे बसून नतद्रष्टपणा किंवा दळभद्रीपणा करणाऱ्या घटकांना तिथल्या सत्ताधाऱ्यांनी तिथेच चेपले पाहिजे.

## काश्मिरविषय सोडून पाकने बोलावे

आज भारताच्या स्वातंत्र्याला ६८ वर्षे झाली आहेत.पाकिस्तानही तेवढाच वयोवृध्द झाला आहे. अशावेळी काश्मिरसारखा मुद्दा उकरून काढण्यामध्ये कोणताच हेतू उरलेला नाही.काश्मिर हे भारताचे अंग आहे, हे आता जगाने मान्य केलेले आहे. भारत काश्मिरबाबत कोणतीही तडजोड स्वीकारत नाही, हे यापूर्वीच्या तीन युध्दांमधून सिध्द झालेले आहे. अशा परिस्थितीत तोच मुद्दा पुढे करून पाकिस्तान जर चर्चेसाठी येणार असेल तर भारताला या चर्चा मान्य होण्याचा प्रश्नच येत नाही. उलट यापुढे भारताने काश्मिरचा मुद्दा वगळूनच पाकिस्तानशी चर्चा केली पाहिजे. काश्मिरमधले प्रश्न हे भारताचे अंतर्गत प्रश्न आहेत. त्याचा आणि पाकिस्तानचा सुतराम संबंध नाही. तिथल्या फुटीरतावाद्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून पाकिस्तान भारताला जर धमकावण्याचा प्रयत्न करेल,तर ते यशस्वी होणारे नाही. आता केवळ काश्मिरमध्ये निवडणुका येऊ घातल्या आहेत. त्यामध्ये फुटीरतावाद्यांची डाळ शिजण्याची शक्यता नाही. लोकसभा निवडणुकीत तिथला सत्ताधारी आणि इतर सगळ्याच राजकीय पक्षांना जबरदस्त पराभव पत्करावा लागला.या पूर्णपणे बदललेल्या परिस्थितीत काश्मिरमध्ये सत्तांतर होऊ शकते.आणि फुटीरतावाद्यांबरोबरच आपल्याही अस्तित्वाला धक्का लागू शकतो, या भीतीने पाकिस्तानमधल्या काही फुटीरतावाद्यांच्या खुशामतखोरांनाही खुमखुमी आलेली दिसते. त्याला ठोकरून लावणे हाच पर्याय शिल्लक राहतो.